| MHPU180007892015 | लताबाई गाढवे<br>विरूध्द<br>बबन दोरगे व इ. |
|---|---|

## निशाणी क्र.११२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी ने मयत प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास ४ वर्षे १३ दिवस झालेला विलंब माफीकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे हे दिनांक २४.०४.२०२१ रोजी मरण पावले. प्रतिवादींनी सदर मयत प्रतिवादी क्र.५ यांची मयत झाल्याची माहिती वादीस दिली नाही. तसेच, मयत प्रतिवादीचे वारसांना मृत्यूदाखल्याची मागणी केली असता त्यांनी वादीस दिली नाही. वादीने मयत वारसांच्या तोंडी सांगण्यावरून पुरशिस अभिलेखावर दाखल केली होती. त्यामुळे सदर मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास ४ वर्षे १३ दिवस उशिर झाला. सबब, सदर अर्ज मंजूर करण्याची वादीने विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे म्हणणेनुसार सदरचा अर्ज बरोबर नसुन अर्जातील विलंबाचे कारण नमुद नाही. तसेच, त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. विलंबाचे वर्ष व दिवस चुकीचे नमुद केले आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले. कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा जाहीर ठराव, निरंतर मनाई, ताबा व कायदेशीर वाटपपत्राचा आणि पोकळीस्त खरेदीखत तसेच, पोकळीस्त हक्कसोडपत्र रद्द होण्याकरीता दाखल असल्याने मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. सदरचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्र.५ मरण पावल्यापासुन ९० दिवसांच्या आत दाखल केला नाही. सदर प्रतिवादी क्र.५ यांचे वारस

अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ होवुन मिळण्याकरीता दिलेली कारणे संयुक्तिक आहेत. प्रकरणातील दाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जदारांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील आदेश परीत करतो –

**आदेश**

१. निशाणी ११२ वरील अर्ज रु.५००/– खर्च लावून मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी तर्फे मयत प्रतिवादी क्र.५ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.31 17:43:17 +0530

ठिकाणः दौंड,
दिनांक ३०/०७/२०२६

**(एस.एन. पाटील)**
२रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे